Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal

E ISSN -3048-8095 / Bimonthly / January- February 2025 / VOL -01 ISSUE-IV

22

# रवींद्र शोभणे यांच्या साहित्यात मांडलेली स्त्री समस्या-हुंडा व हुंडा बळी

**प्रा.डॉ.सुनिल भावराव देसले**
उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, दहिवेल, ता- साक्री जि - धुळे

---

**प्रस्तावना-** प्राचीन काळापासून भारतीय समाज व्यवस्था पुरुषसत्ताक असल्यामुळे समाजात स्त्रीला दुय्यम स्थान दिले गेले, परिणामतः परंपरेच्या चक्रात अडकलेल्या भारतीय स्त्रीला गुलामापेक्षाही खालच्या थराचे जीवन जगावे लागले. भारतीय स्त्रीला दिलेले हे दुय्यम स्थान व्यवस्था प्रणित असल्यामुळे स्त्रीच्या जीवनात सतत समस्यांची निर्मिती होत राहिली आहे. प्राचीन काळी स्त्रियांच्या शिक्षणाला बंदी असल्यामुळे अशिक्षित,अडाणी असणाऱ्या स्त्रियांचे सतत मानसिक, शारीरिक शोषण होत राहिले. त्याचाच एक भाग म्हणजे बालविवाह, विधवा - बालविधवा, केशवपण, सती जाणे, मुरळी म्हणून देवीला सोडणे. या सर्व समस्यांपेक्षा वरचढ अशी समस्या म्हणजे हुंडा आणि हुंडाबळी समस्या होय. स्त्रीच्या जीवनात समस्यांचा डोंगर उभा करणाऱ्या असंख्य रूढी परंपरा आणि प्रथा समाजात अस्तित्वात होत्या आणि आजही आहेत. मात्र आधुनिक काळात स्त्रिया शिक्षण घेऊन जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तबगारीचा ठसा उमटवू लागल्या आहेत, तरीही या सुशिक्षित झालेल्या स्त्रियांच्या जीवनातील समस्या मात्र कमी झालेल्या नाहीत तर शिक्षण आणि आधुनिकीकरणामुळे स्त्रियांच्या समस्यांमध्ये फक्त बदल झालेला दिसून येतो. उदाहरणच द्यायचे झाले तर विज्ञान युगामुळे लिंगनिदान चाचणी शक्य झाली आणि स्त्री भ्रूणहत्या समाजात मोठ्या प्रमाणात घडून येऊ लागल्या. तसेच बालविवाह बंदी झाल्यामुळे बाल विधवांची समस्या संपली असली तरी हुंडा आणि हुंडाबळी यासारख्या नव्या समस्यांनी उग्ररूप धारण केले आहे. म्हणजेच काळानुसार समाज बदलतो आणि या बदलानुसार स्त्रियांच्या समस्यांच्या रूपात फक्त बदल होतो. त्या समस्या कमी होत नाहीत किंवा संपतही नाहीत फक्त त्यात नवनव्या समस्यांची भर पडत जाऊन आज स्त्री समस्यांचा डोंगर समाजात उभा असलेला दिसतो.

आधुनिक मराठी साहित्याच्या उदयाच्या काळातच बाबा पद्मनजींनी यमुना पर्यटन सारख्या कादंबरीतून समाजातील विधवांच्या समस्यांची चर्चा केली होती, तर महात्मा ज्योतिराव फुले यांनी आपल्या साहित्यातून स्त्रियांच्या अनेक समस्यांना वाचा फोडली आहे. त्यानंतरच्या मराठी साहित्यात स्त्रियांच्या विविध समस्या सतत मांडल्या जात आहेत. रवींद्र शोभणे यांनीही आपल्या साहित्यातून स्त्रियांच्या जीवनातील विविध समस्या मांडत असताना या सर्व समस्यांमध्ये अग्रगण्य असलेली समस्या म्हणजे भारतीय विवाह पद्धतीमध्ये असलेली हुंडा प्रथा किंवा हुंडाबळी अशा समस्या त्यांनी मांडलेल्या आहेत. रवींद्र शोभणे आपल्या कथा कादंबरी वाङ्मयातून वास्तव समाज चित्रण करीत असताना, समाजाचा एक महत्त्वाचा परंतु पुरुषप्रधान संस्कृतीने उपेक्षित ठरविलेल्या स्त्रियांच्या जीवनातील अनेक प्रसंगांचे चित्रण करीत असतांना त्यांच्या जीवनातील समस्या ही ते सहजपणे मांडतात.

## रवींद्र शोभणे यांच्या साहित्यात मांडलेली हुंडा समस्या :-

रवींद्र शोभणे यांनी आपल्या कथा, कादंबरीतून हुंड्याची समस्या मांडत असताना या संदर्भात लोकांची मानसिकता कशी विकृत झाली आहे याची मांडणी केली आहे. आज समाज एकीकडे विज्ञान युगाचा ध्यास घेत आहे त्याच्या परिणामातून समाजात विविध प्रकारचा बदल घडवून येतो आहे. मनुष्य प्रगतीचे क्षेत्र पादाक्रांत करीत असताना भारतीय समाजातील हुंड्यासारखी जुलमी पद्धत नष्ट न होता तिचे स्वरूप दिवसेंदिवस वाढताना दिसते आहे. हुंड्याच्या या वाढत्या विक्राळ स्वरूपामुळे समाजात ज्या समस्या निर्माण होतात किंवा मुलीच्या बापाला ज्या अडचणींना तोंड द्यावे लागते त्यांची मांडणी रवींद्र शोभणे यांनी आपल्या साहित्यातून केले आहे.

भारतीय समाजात वरदक्षिणा म्हणून सुरू झालेल्या या पद्धतीने पुढे पुढे हुंडा म्हणून विकृत स्वरूप धारण केले. यामुळे मुलाच्या बापाने आपला मुलगा विकायला काढला आहे की काय? अशी अवस्था होऊन गेली आहे. यासंदर्भात 'पडघम' कादंबरीत खासदार नारायण यावलकर हे अरुण जाधव ला म्हणतात, "केवळ इंजीनियरिंग ची साधी पदवी जरी मिळालेला मुलगा असेल ना तरी तो तीन- तीन, चार - चार लाखात विकला जातो म्हणतात." अशी परिस्थिती जवळपास फरकाने सगळीकडे आहे हे वास्तव शोभणेंनी मांडले आहे जो जास्त हुंडा देईल त्याच्या मुलीशी आपल्या मुलाचा विवाह करू अशी लिलावाची भाषा मुलाच्या बापाची असल्यामुळे शोभणेंच्या 'घोर' कथेत इंदूला पसंत करणारा मुलगा सावरगावच्या मुलीकडून जास्त हुंडा मिळाला म्हणून तिच्याशी विवाह करतो. येथे हुंड्या संदर्भात मुलाकडच्यांचा असलेला हावरटपणा लेखकांने व्यक्त केला आहेच पण मुलाच्या अशा वागण्यामुळे मुलीच्या बापाची मात्र आत्महत्या करण्यासारखी परिस्थिती निर्माण होते याची ही मांडणी शोभन यांनी केली आहे.

हुंडा देणे आणि घेणे याला कायद्याने बंदी आहे, पण कायद्याने बंद असलेल्या या गोष्टी समाजात राजरोसपणे चालतात, त्याला कारण हुंडा घेणारा जेवढा जबाबदार असतो तेवढाच हुंडा देणारा मुलीचा बापही जबाबदार असतो हे शोभणे सुचवू इच्छितात त्यांच्या 'घोर' कथेतील आबाची मुलगी जेव्हा लग्नाची होते तेव्हा त्यांच्या या मानसिकतेचे दर्शन त्यांच्या बोलण्यातून होते तेव्हा आबा म्हणतो, "हुंडा

©Copyright 2024 ADRJ. All Rights Reserved

E ISSN -3048-8095 / Bimonthly / January- February 2025 / VOL -01 ISSUE-IV

दिवून चांगला पोरगा पहावा म्हन्लं. मग पोराले हुंडा द्या साठी वावर बी इका लागलं त त्याची पर्वा कराची न्हाई म्हून ठरोलं." हुंडा पद्धतीची समस्या वाढविण्यासाठी आबा सारखे मुलीचे बापही तेवढेच जबाबदार आहेत हेच लेखकाला येथे व्यक्त करावयाचे आहे. मात्र आपल्या मुलीला जास्त हुंडा देऊन चांगला मुलगा शोधण्याच्या स्पर्धेत ज्यांची हुंडा देण्याची परिस्थितीच नाही त्यांच्या मुलीच्या अवस्थेचे वर्णन रवींद्र शोभणे यांनी 'प्रवाह' या कादंबरीत केले आहे. या कादंबरीतील ताराचे लग्न होऊन तिला मुलगी होते मात्र तरीही तिच्या बरोबरीच्या उमा नावाच्या मुलीचे लग्न होत नाही त्याचे कारण देताना निवेदक म्हणतो "तिला म्हणे योग्य वर उतरतच नाही, आणि एखादा आलाच तर हुंड्यासाठी मोठ्ठ तोंड फाडतो. मुलगी पसंत पडत होती, पण शेवटी देण्याघेण्यावरून फिसकटून जायचं." येथे मुलाला हुंडा देण्यासाठी पैसा नसेल तर अशा मुलींना लग्नाचे वय निघून जाते तरी घरीच बसावे लागते हे समाज वास्तव रवींद्र शोभणे यांनी मांडलेले आहे.

रवींद्र शोभणे यांनी हुंडा देण्यासाठी मुलीच्या बापांना कोण कोणते दिव्य करावे लागते व कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते याचे चित्रण आपल्या साहित्यातून केले आहे. त्याचप्रमाणे जर एखाद्या माणसाला दोन - तीन मुली असतील तर त्याचे संपूर्ण आयुष्यच मुलींच्या लग्नात झालेल्या कर्जाचा डोंगर फेडण्यात जाते, वेळप्रसंगी कर्जाचा डोंगर फेडता येणार नाही या मानसिकतेतून तो मुलीचा बाप आत्महत्येसारखा मार्गही निवडतो. रवींद्र शोभणे यांच्या 'पांढर' कादंबरीतील तीन मुलींचा बाप असलेला वासुदेव काळे मुलींच्या लग्नासाठी लागणाऱ्या हुंड्याच्या काळजीने चिंतित असतो त्यावेळेस तो नागोरावला आपल्या परिस्थिती विषयी जाणीव करून देताना म्हणतो "घरी एकापाठोपाठ एक अशा लग्नाच्या तीन पोरी. म्हणलं तर वर्षा काठी लग्न करा लागंन, पण आपून पल्लो कुणबी. हुंड्या वाचून पोरीले कोणी मांगत न्हाई. इची भैन जहयर खावून मराची वेळ येणार."हुंड्याच्या समस्येमुळे बापावर मरणाची वेळ येते हे वासुदेव काळच्या उदाहरणातून स्पष्ट होते. त्यातच वासुदेव काळे च्या मुलीला पाहण्यासाठी येणाऱ्या व्यक्तीने आपण आपल्या मुलीला पन्नास हजार रुपये हुंडा दिला म्हणून त्याच्या मुलालाही पन्नास हजार रुपये हुंडा पाहिजे असतो, हीच मानसिकता आज समाजामध्ये सर्वत्र दिसून येते. याची प्रातिनिधिक मांडणी रवींद्र शोभणे यांनी केली आहे.

रवींद्र शोभणे हुंडा समस्या आपल्या साहित्यातून मांडत असताना त्या एका समस्येमुळे समाजात इतर अनेक समस्या निर्माण होतात उदाहरणार्थ हुंडा देण्यासाठी पैसे नसतील तर मुलीचा बाप सावकाराकडून कर्ज काढतो त्यासाठी जमीन गहाण टाकतो आणि कर्ज फिटत नाही म्हणून जमीन त्या सावकाराच्या घशात जाते. मुलीच्या लग्नात होण्यासाठी लागणारा पैसा जर बापाजवळ नसेल तर संपूर्ण कुटुंब चिंताग्रस्त असते, इतकेच नाही तर स्वतः मुलगी सुद्धा त्या हुंड्याच्या समस्येमुळे स्वतःला दोषी समजत असते म्हणूनच रवींद्र शोभणे यांच्या 'पांढर' कादंबरीतील दिपाली आपल्या बापाला आपल्या लग्नासाठी लागणारा हुंडा देणे शक्य नाही म्हणून आत्महत्या करते तर नागोराव कडू ची मुलगी शारदा ही गावातीलच प्रकाश इंगोले नावाच्या तरुणासोबत निघून जाते आणि जाताना लिहून गेलेल्या चिठ्ठीत बापाला हुंडा देण्यासाठी असलेली आर्थिक अडचण असे कारण लिहून जाते म्हणजेच आपल्या लग्नासाठी आपल्या बापा पुढे हुंडा देण्यासाठी निर्माण झालेली आर्थिक अडचण त्या विचारी मुलींना अशा प्रकारचे कृत्य करण्यास भाग पाडते. मात्र या गोष्टी निष्पाप समाजासाठी योग्य नाहीत हेच शोभणे यांना वाटते म्हणूनच रवींद्र शोभणे यांनी आपल्या कथा व कादंबरी वाङ्मयातून हुंडा पद्धत किती अन्यायकारक आहे, त्यामुळे समाजाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते याची मांडणी ते करतात.

**रवींद्र शोभणे यांच्या साहित्यात मांडलेली हुंडाबळी समस्या** :- रवींद्र शोभणे यांनी हुंडाबळीची समस्या आपल्या कथा, कादंबरीतून मांडत असताना समाजाच्या या वैगुन्यावर बरोबर बोट ठेवले आहे. आज कायद्याने स्त्रियांना भरपूर अधिकार दिले असले तरी समाज मात्र जुन्या मानसिकतेतून बाहेर पडायला तयार नाही. आजही दररोजच्या वृत्तपत्रामधून किंवा टीव्ही सारख्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या बातमीपत्रात स्त्रियांच्या छळा विषयीच्या अनेक बातम्या वाचायला मिळतात किंवा ऐकायला मिळतात. रवींद्र शोभणे यांनी आपल्या साहित्यातून थोड्याफार पैशांच्या लोभापाई सुनेचा बळी घेण्यासही कमी न करणाऱ्या या समाजातील विकृत मानसिकतेचा वेध घेतला आहे.

समाजात लग्नासारख्या पवित्र समारंभात पैशांचा व्यवहार घडून येतो त्याला हुंडा असे म्हटले जाते. मुलीच्या बापाने आपल्याला भरपूर पैसा द्यावा अशी मुलाकडील लोकांची मानसिकता असते. मात्र काही वेळा आर्थिक परिस्थिती पुढे शरण जाऊन मुलीचा बाप मुलाकडून व्यक्त केल्या गेलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यास असमर्थ ठरतो तेव्हा तो राग मुलीवर काढला जातो. तिच्या सासरी होणाऱ्या खेळातून बळी सुद्धा घेतला जातो, मात्र या सर्व परिस्थितीला फक्त मुलाकडीलच व्यक्ती जबाबदार असतात असे नाही तर याला काही प्रमाणात मुलीचा बापही जबाबदार असतो याविषयी 'चिरेबंद' कादंबरीतील मुख्याध्यापिका मालती म्हणते "हुंडाबळीत मुलींच्या वडिलांचा दोष असतो मुलीचे वडील बाजारभाव लावल्यासारखे हुंडा मोजून सुशिक्षित चांगल्या मुलाला आपल्याकडे ओढतात आणि मग तेही पैशाला चटवतात."या पैशाला चटावलेल्या लोकांच्या अपेक्षा पुढे वाढत जातात त्यातूनच पैशांची मागणी वाढत जाते आणि ती पूर्ण होत नाही म्हणून त्या मुलीचा छळ होतो तेव्हा ती स्वतःला जाळून घेते किंवा तिचे सासरचेच लोक तिचा जीव घेतात. अशाप्रकारे समाजात हुंडाबळीच्या घडणाऱ्या घटनांवर आपल्या साहित्यातून प्रकाश टाकून रवींद्र शोभणे यांनी या समस्येकडे समाजाचे लक्ष वेधले आहे.

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / January- February 2025 / VOL -01 ISSUE-IV

समाजात हुंडाबळीच्या घडणाऱ्या घटना या अशिक्षित कुटुंबापेक्षा सुशिक्षित कुटुंबातच जास्त घडताना दिसतात त्याविषयी मत व्यक्त करताना 'चिरेबंद' कादंबरीतील सामाजिक कार्यकर्ते मालती जाधव म्हणते "हुंडाबळी जातात त्या सुशिक्षित मुलीच ना?" या वाक्यातून अशिक्षितांपेक्षा सुशिक्षित तसेच श्रीमंत व्यक्तींची मानसिकता जास्त विकृत असते किंवा त्यांच्यात लोभीपणाचा कळस असतो. याची मांडणी शोभन यांनी 'चिरेबंद' या कादंबरीत केली आहे. शहरातील एका श्रीमंत व्यक्तीच्या घरी नवी सून लग्नानंतरच्या सहा महिन्यातच जळून मरते तेव्हा तिचा नैसर्गिक मृत्यू झाला नसून तिचा बळी घेतला गेला आहे असे तिचे वडील पुराव्यासह सांगतात तेव्हा अशा श्रीमंत कुटुंबांच्या दरिद्री मानसिकतेचे दर्शन रवींद्र शोभणे 'चिरेबंद' या कादंबरीत चित्रित करतात.

रवींद्र शोभणे यांनी हुंडाबळी ची समस्या 'पांढर' कादंबरीतही मांडली आहे, या कादंबरीतील वासुदेव काळे आपल्या मुलीला पन्नास हजार हुंडा देऊन एका सरकारी नोकरी करणाऱ्या मुलाला आपली मुलगी देतो. मात्र हुंड्याचे वीस हजार देणे बाकी असल्यामुळे सासरी नांदणाऱ्या सुरेखाला प्रचंड त्रास दिला जातो. सुरेखाला सासरी होणारा त्रास ऐकून तिचा हुंडाबळी ठरू नये म्हणून वासुदेव काळे तिला सासरी पाठवीत नाही म्हणूनच त्याविषयीचे कारण सांगताना तो म्हणतो "पेपरात बातम्या येते, हळद उतराच्या आत नवी नवरी जळून मेली. थ्या सूनवायऱ्या पोरी स्वतः न्हीई मरत बाई. तिले तिच्या सासरचे लोक जाळते. न्हीई तं जळाले मजबूर करते" या ठिकाणी वासुदेव काळे च्या तोंडी शोभणेंनी मांडलेलं मत म्हणजे समाजाच्या डोळ्यात घातलेले झणझणीत अंजनच आहे. समाजातील अशा घटनांची मांडणी आपल्या साहित्यातून करून अशा घटना घडू नयेत म्हणून समाजात जागृती निर्माण करण्याचा रवींद्र शोभणे यांचा हा प्रयत्न आहे असे आपणास म्हणता येईल.

आज समाजातील हुंडाबळींची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. हुंडाबळींचे हे सत्र थांबवायचे असेल किंवा तिचे समूळ उच्चाटन करायचे असेल तर त्या संदर्भात समाजात जागृती करून समाजाची हुंडा संदर्भातील मानसिकता बदलणे गरजेचे आहे त्याचबरोबर कायद्याचे कठोरतेने पालन झाल्याशिवाय हुंडा आणि हुंडाबळी यासारख्या कुप्रथाचे समाजातून उच्चाटन होणे शक्य दिसत नाही त्यासाठी समाजात जागृती होणे ही काळाची गरज आहे हेच रवींद्र शोभणे यांच्या साहित्यातील या मांडणी मागचा उद्देश आहे.

**निष्कर्ष :-**

1) रवींद्र शोभणे यांनी स्त्रियांच्या समस्या जाणून घेऊन त्याची मांडणी आपल्या साहित्यातून करून समाजाचे लक्ष वेधले आहे.

2) रवींद्र शोभणे यांनी आपल्या साहित्यातील व्यक्तिरेखा द्वारे हुंड्याची समस्या मांडून प्रगत समाजासाठी ती प्रथा किती घातक आहे याची समाजाला जाणीव करून दिली.

3) रवींद्र शोभणे यांनी आपल्या कथा कादंबऱ्यांच्या आशय विषयात हुंडाबळींची समस्या मांडून समाजाला त्याविषयी जागृत करण्याचा प्रयत्न केलेला आहे

4) आधुनिकतेचा स्वीकार केलेल्या समाजाच्या निकोप वाढीसाठी समाजातील अनिष्ट रूढी परंपरा, प्रथा नष्ट करण्यासाठी रवींद्र शोभणे यांनी आपल्या साहित्यातील कथानकाच्या माध्यमांतून प्रयत्न केलेला आहे.

**संदर्भ ग्रंथ:-**

1) रवींद्र शोभणे, 'पांढर' मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई,प्रथम आवृत्ती २००९
2) रवींद्र शोभणे, 'पडघम' मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, ,प्रथम आवृत्ती २००७
3) रवींद्र शोभणे, 'घोर' (शहामृग) मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई प्रथम आवृत्ती 1998
4) रवींद्र शोभणे, 'कोंडी' देशमुख आणि कंपनी, प्रथम आवृत्ती 1991
4) रवींद्र शोभणे, 'प्रवाह' म.रा.सा.सं. मंडळातर्फे प्रकाशित ,प्रथम आवृत्ती 1983
5) रवींद्र शोभणे, 'चिरेबंद' देशमुख आणि कंपनी ,प्रथम आवृत्ती 1995